MAHARASHTRA TOURISM

# महाराष्ट्र

# एक अमर्याद प्रवास!

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन
डिसेंबर 2025 / अंक 12



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प



कुणकेश्वर समुद्रकिनारा



चिखलदरा

## महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

डिसेंबर महिना पर्यटन क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने परिपूर्ण ठरला. वर्षाअखेरीस मिळालेल्या सुट्ट्या आणि नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांनी राज्याच्या विविध पर्यटन स्थळांकडे गर्दी केली होती. शिवाय पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानांमध्ये राहण्याकडे पर्यटकांचा अधिक कल होता. महिन्याभरात आयोजित करण्यात आलेल्या विविध महोत्सवांमध्ये महाराष्ट्र पर्यटन विभागाचे दालनही उभारण्यात आले होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किटला राज्यभरातून प्रतिसाद

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या पर्यटन संचालनालयामार्फत दि. 3, 4 व 5 डिसेंबर 2025 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किटचा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. यावेळी पर्यटन विभागाचे उपसचिव मा. श्री. संतोष रोकडे, मा. श्री. सिद्धार्थ रामकुमार (भा.प्र.से), पर्यटन संचालनालयाचे सहाय्यक संचालक मा. श्री. सुशील पवार तसेच विभागातील अन्य मान्यवर उपस्थित होते.




मुंबईतील चैत्यभूमी येथे भेट देणारे पर्यटक तसेच अनुयायींसाठी सदर टूर सर्किट निःशुल्क होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रेरणादायी महान कार्य, त्यांचे जीवनचरित्र, विचार सगळ्या स्तरांतील पर्यटक तसेच नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या टूर सर्कीटचा मुख्य उद्देश होता. तीन दिवसीय टूर सर्किटमध्ये प्रत्येक वयोगटातील पर्यटक, नागरिकांनी सहभाग घेतला होता. या टूर सर्किटमध्ये मुंबईतील चैत्यभूमी, राजगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इकॉनॉमिक्स व कॉमर्स महाविद्यालय, वडाळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, परळमधील बीआयटी चाळ, सिद्धार्थ महाविद्यालय, फोर्ट आदी स्थळांना पर्यटकांनी भेट दिली.

## 'फ्लेवर्स ऑफ महाराष्ट्र 2025' महाराष्ट्राच्या पर्यटन विभागाचे दालन

महाराष्ट्राच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीचे आणि पाककलेचे दर्शन घडविण्यासाठी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाच्या वतीने दिनांक 12 ते 14 डिसेंबर 2025 या कालावधीत 'फ्लेवर्स ऑफ महाराष्ट्र 2025'चे आयोजन करण्यात आले होते.




या महोत्सवात महाराष्ट्र शासनाचा पर्यटन विभागाने सहभाग घेतला होता. महोत्सवात महाराष्ट्राचे विशेष दालन उभारण्यात आले. या दालनाच्या माध्यमातून राज्यातील निसर्गरम्यता, ऐतिहासिक स्थळे आणि समृद्ध पर्यटनाची माहिती उपस्थित नागरिकांना मिळाली.

या महोत्सवाच्या आयोजनात महाराष्ट्र सदनाचे निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती आर. विमला, भा.प्र.से आणि निवासी आयुक्त (गुंतवणूक) श्री. सुशील गायकवाड, भा.प्र.से. यांचा महत्त्वपूर्ण पुढाकार होता.

# आगामी कार्यक्रम

## दादर येथील शिवाजी पार्कमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजी पार्क परिसर ढोल-ताशांच्या गजरात गजबजून जाणार आहे. 26 जानेवारी निमित्त सकाळी 6.00 वाजल्यापासून शिवाजी पार्क येथे खास संचलन असणार आहे. या संचलनाच्या माध्यमातून राज्यातील विविध संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. समुद्रकिनाऱ्याला लागून असलेल्या या ठिकाणी संचलनामध्ये महाराष्ट्र पर्यटन विभागाचा चित्ररथही असणार आहे. या चित्ररथाद्वारे राज्यातील समृद्ध पर्यटन स्थळांची पर्यटकांना नव्याने ओळख होईल.

## भारत पर्व 2026

लाल किल्ल्यासमोर लॉन्स व ज्ञानपथ, नवी दिल्ली येथे 26 ते 31 जानेवारी दरम्यान 'भारत पर्व 2026' महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवामध्ये विविध राज्यांतील सांस्कृतिक विविधता, खाद्यपदार्थ, पोशाख, हस्तकला, लोककला आणि संगीताचे अनोखे दर्शन घडणार आहे.
'भारत पर्व 2026'मध्ये महाराष्ट्र शासनाचे पर्यटन विभाग दालन उभारून सहभाग घेणार आहे. या दालनाद्वारे राज्यातील विविध पर्यटन क्षेत्र, पर्यटन स्थळी जाण्याची सोय, उपलब्ध सोयी-सुविधा इत्यादी माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. राज्यातील पर्यटन स्थळांची माहिती जगभरात पोहोचविणे हा या दालनामागील मुख्य उद्देश होता.

# महत्त्वाच्या बातम्या

## सिंधूदुर्गात पहिल्यांदाच पंचतारांकित हॉटेल

सिंधूदुर्ग जिल्ह्यात पर्यटन विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, जिल्ह्यातील शिरोडा–वेळाघर येथे इंडियन हॉटेल कंपनी लिमिटेड (IHCL – ताज ग्रुप) मार्फत उभारण्यात येणाऱ्या पहिल्या पंचतारांकित हॉटेल प्रकल्पास गती देण्यासाठी बैठक घेण्यात आली.
शिरोडा–वेळाघर येथील या प्रकल्पासाठी खाजगी व शासकीय अशा सुमारे 52.63 हेक्टर क्षेत्रातील जमीन संपादित करण्यात आली आहे. पुढील काळात स्थानिक ग्रामस्थ, इंडियन हॉटेल कंपनी लिमिटेड (IHCL – ताज ग्रुप) आणि महाराष्ट्र पर्यटन विभाग यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात येणार आहे.



मत्स्य व बंदरे मंत्री मा. श्री. नितेश राणे यांनी पर्यटन मंत्री मा. श्री. शंभूराज देसाई यांचे विशेष आभार मानले. पर्यटन मंत्र्यांच्या पुढाकारामुळे हा रखडलेला प्रकल्प पुन्हा मार्गी लागला असून, सिंधूदुर्ग जिल्ह्यातील पहिले पंचतारांकित हॉटेल साकार होण्यास मोठी चालना मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

## कोकणातील पर्यटन स्थळांना पर्यटकांची पसंती

सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटकांनी कोकणात गर्दी केली होती. विशेषतः पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानांमध्ये राहणे पर्यटकांनी पसंत केले. कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील निवासस्थानांचे 100 टक्के आरक्षण झाले होते.



पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानांना पर्यटकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे, वेळणेश्वर, गुहागर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली, हरिहरेश्वर, रायगड जिल्ह्यातील मुरुड जंजिरा, अलिबाग अशा भागातील पर्यटन स्थळे पर्यटकांच्या पसंतीत उतरलेली आहेत.

## परदेशी पर्यटकांची महाराष्ट्राला पहिली पसंती


भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकांची पहिली पसंती महाराष्ट्राला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या भारत पर्यटन माहिती संकलन 2025 या अहवालात ही आकडेवारी समोर आली आहे.



गेल्या वर्षी सुमारे 37 लाख परदेशी पर्यकांनी महाराष्ट्राला भेट दिली होती. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सर्वाधिक परदेशी पर्यटकांचे आगमन महाराष्ट्रातच झाले आहे. सन 2024मध्ये सुमारे दोन कोटी परदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली.

## 'स्वदेश दर्शन' योजनेअंतर्गत धार्मिक पर्यटन स्थळांचा विकास

नागपूर जिल्ह्यातील वाकी, अडासा, धापेवाडा, पारडसिंगा, तेलंगखेडी आणि गिरड  ही सहा प्रमुख धार्मिक पर्यटन स्थळे 'स्वदेश दर्शन' योजनेअंतर्गत विकसित केली जाणार आहेत.



भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने या ‘आध्यात्मिक सर्किट’ अंतर्गत एकूण 45.47 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. या निधीचा उपयोग देवस्थानांमधील सोयीसुविधा, रस्ते, निवास व्यवस्था, स्वच्छतागृहे आणि इतर आवश्यक सुविधांसाठी केला जाईल. ज्यामुळे भाविकांना कोणतेही अडथळे निर्माण होणार नाहीत.

सदर योजनेमुळे आध्यात्मिक पर्यटनाला चालना मिळेल. त्याचबरोबरीने स्थानिक भागात रोजगाराच्या संधी वाढतील आणि शाश्वत पर्यटनाच्या संकल्पनेला अधिक बळकटी मिळेल.

# हिवाळ्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळे

## तारकर्ली

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा उल्लेख होताच तारकर्लीचे निसर्गसौंदर्य आणि स्वच्छ समुद्रकिनारा डोळ्यासमोर उभा राहतो. कुणकेश्वरपासून अगदी जवळच असलेले हे ठिकाण कोकण संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवते. जलक्रिडा प्रेमींसाठी तर तारकर्ली म्हणजे आकर्षणाचे ठिकाण आहे. स्वच्छ समुद्र असल्यामुळे इथे स्कुबा डायव्हिंग करण्याकडे पर्यटकांचा अधिक कल असतो. साहसी पर्यटकांसाठी विविध जलपर्यटन क्रिडाही येथे उपलब्ध आहेत. जवळच सिंधुदुर्ग किल्ला असल्यामुळे इतिहासप्रेमींना हे ठिकाण अधिक भुरळ घालते.



## अजिंठा वेरूळ लेणी



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा व वेरूळ लेण्यांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. युनेस्को मान्यताप्राप्त या लेण्या भारतीय कलेचे सर्वोत्तम दर्शन घडवतात. शिल्पांवरील कोरीव काम, शिलालेख, शांत वातावरण पर्यटकांना मंत्रमुग्ध करते. अजिंठा लेणी प्राचीन बौद्ध गुहा मंदिरांचे दर्शन घडवते. प्राचीन भारतातील बौद्ध भिक्षूंच्या जीवनपद्धती येथे जवळून अनुभवता येतात. तर वेरूळ लेण्यांमध्ये हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मांचे दर्शन घडते.

## पन्हाळा

छत्रपती शिवाजी महाराजांचा बालेकिल्ला असलेला पन्हाळा किल्ला सह्याद्रीच्या डोंगररागांमध्ये वर्षानुवर्षे इतिहासाची साक्ष देत उभा आहे. कोल्हापूर जवळील हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आठवण करून देतो. किल्ल्याच्या तटबंदीवरुन दिसणारा निसर्गरम्य परिसर पर्यटकांना सुखावणारा आहे. हिवाळ्यातील थंड वातावरणात पन्हाळा किल्ल्यावर मनसोक्त फिरण्याची आणि येथील आजूबाजूच्या परिसरात रमून जाण्याची मजा काही औरच आहे.



MAHARASHTRA TOURISM

MAHARASHTRA

www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org

Follow us on:

MaharashtraTourism

diot@maharashtratourism.gov.in

@maha_tourism

maharashtratourismofficial